**श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती, सोलापूर**
**बाजार समितीचा संक्षित अहवाल**

❖ **बाजार समिती स्थापना :-**

श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती सोलापूर च्या प्रत्यक्ष कामकाजास दिनांक १७/४/१९६१ पासून सुरुवात झाली. सध्या महाराष्ट्र कृषि उत्पन्न खरेदी-विक्री (नियमन) अधिनियम १९६३ व नियम १९६७ नुसार सोलापूर बाजार समितीचे कामकाज चालू आहे.

❖ **बाजारक्षेत्र व भौगोलिक माहिती : -**

श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती सोलापूरचे कार्यक्षेत्र उत्तर सोलापूर व दक्षिण सोलापूर तालुक्याचे आहे. बाजार क्षेत्रात सोलापूर शहर व उत्तर सोलापूर तालुक्यातील ४१ व दक्षिण सोलापूर तालुक्यातील ८९ असे एकूण १३० गावांचा समावेश आहे.

❖ **नियंत्रित शेतीमाल :-**

श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती सोलापूर ने सन १९६१ या वर्षी सुरुवातीस १८ शेतीमालाचे व्यवहार नियंत्रित केले होते. सध्या बाजार समितीचे नियंत्रणाखाली ६७ शेतीमालाचे व्यवहार आहेत.

❖ **श्री. सिध्देश्वर बाजारपेठ - मुख्य बाजार आवार : -**

**श्री. सिध्देश्वर बाजार पेठ असून तिचे क्षेत्र १०१ एकर इतके आहे.**

**१. भुसार बाजार ४२ एकर २३ गुंठे**
**२. फळे व भाजीपाला बाजार २८ एकर**
**३. प्रक्रिया विभाग २० एकर ३५ गुंठे**
**४. कडबा व जनावर बाजार १० एकर ५ गुंठे**
**५. मौजे दोड्डी, ता. दक्षिण सोलापूर येथे ७ एकर जमिन**

❖ **सांपत्तिक स्थिती** - बाजार समितीचे सन १६६०-६१ चे उत्पन्न रुपये ४५ लाख होते. सन २०२४-२०२५ या वर्षात रुपये ३५,६२,१९,३७०/८० इतके उत्पन्न झाले आहे. मागील पाच वर्षाचे उत्पन्न, खर्च व वाढावा खालीलप्रमाणे आहे.

| सन | उत्पन्न रुपये | खर्च रुपये | वाढावा (शिल्लक) | विकास कामे |
|---|---|---|---|---|
| २०२०-२०२१ | २३ कोटी ६० लाख | १५ कोटी २६ लाख | ८ कोटी ३४ लाख | २६ लाख ३६ हजार |
| २०२१-२०२२ | २५ कोटी २० लाख | १७ कोटी ८५ लाख | ७ कोटी ३५ लाख | २ कोटी ७१ लाख |
| २०२२-२०२३ | २२ कोटी २८ लाख | १७ कोटी ५० लाख | ४ कोटी ७७ लाख | ९ कोटी ६९ लाख |
| २०२३-२०२४ | ३१ कोटी ६१ लाख | १९ कोटी ७१ लाख | ११ कोटी ९० लाख | ११ कोटी ७२ लाख |
| २०२४-२०२५ | ३५ कोटी ६२ लाख | २५ कोटी ५५ लाख | १० कोटी ०७ लाख | ८ कोटी ३८ लाख |

पान २ पहा

मागील पाच वर्षात मुदत ठेवीत गुंतवलेल्या ठेवीची माहिती खालीलप्रमाणे आहे.

| सन | मुदत ठेवीत गुंतवलेल्या ठेवी |
|---|---|
| २०२०-२०२१ | ९० कोटी ८७ लाख |
| २०२१-२०२२ | १०० कोटी ०२ लाख |
| २०२२-२०२३ | १०१ कोटी ०४ लाख |
| २०२३-२०२४ | १०८ कोटी ४० लाख |
| २०२४-२०२५ | ११८ कोटी ९७ लाख |

❖ **शेतीमालाची आवक – जावक** - सोलापूर बाजार पेठेत प्रामुख्याने कांदा, डाळिंब, टोमॅटो, बटाटा, गुळ या शेतीमालाची आवक मोठया प्रमाणात असते. सोलापूर बाजार पेठेत सोलापूर, पुणे, नगर, नाशिक, धुळे, उस्मानाबाद, लातूर या जिल्हयातून कांद्याची आवक होते व सोलापूर येथून विक्री झालेला कांदा हैद्राबाद, विजयवाड, राजमंद्री, वरंगल या भागात पाठविला जातो. सोलापूर बाजार पेठेत सोलापूर, विजापूर, नगर, नाशिक या जिल्हयातून डाळिंब या शेतीमालाची आवक होते व सोलापूर येथून विक्री झालेले डाळिंब हैद्राबाद, विजयवाडा, वरंगल, राजमंद्री, बेंगलोर या भागात पाठविला जातो.

❖ **कांदा उलाढाल** - श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती सोलापूर मध्ये १) सन **२०२२-२०२३** मध्ये ७२६ कोटी ६२ लाख २) **सन २०२३-२०२४ मध्ये ११३९ कोटी ३० लाख** ३) **सन २०२४-२०२५ मध्ये १४८९ कोटी ३ लाख** इतकी कांदा या शेतीमालाची उलाढाल झाली आहे.

❖ **सोयी** - बाजार आवारात शेतीमालाच्या नियंत्रणासाठी प्लॉट, दुकाने यांच्या सुविधा देण्यात आलेल्या आहेत. तसेच बाजार समितीने स्वतःच्या मालकीचे शॉपिंग सेंटर बांधलेली असून त्यामधील दुकाने निरनिराळया व्यवसायासाठी लिव्ह अॅन्ड लायसेन्सने व्यवसायिकांना वाटप केलेली आहेत.

❖ **सेलहॉल** :- बाजार समितीने शेतमालाच्या लिलावासाठी एकूण ७ सेलहॉल बांधलेले आहेत.

❖ **शीतगृह** - बाजार समितीच्या आवारात नाशवंत शेतीमालाच्या साठवणूकीसाठी एक हजार मेट्रीक टनाचे शीतगृह चालू आहे.

❖ **रस्ते** :- बाजार समितीच्या आवारामध्ये सध्या भुसार बाजारातील सर्व रस्ते व फळे व भाजीपाला बाजारातील मुख्य रस्ते हे सिमेंट कॉंक्रीटचे केलेले आहेत. तसेच प्रक्रिया विभागातील सर्व रस्त्यांचे डांबरीकरण केलेले आहे.

तसेच फळे व भाजीपाला विभागातील राहिलेले रस्ते कॉंक्रीटने करणेचे काम चालू आहे. त्याची किंमत रुपये ९ कोटी इतकी आहे.

पान ३ पहा

❖ **पाणी पुरवठा :-** मुख्य बाजार आवारात पाच लाख लिटर्स क्षमतेच्या दोन पाण्याच्या टाक्या बांधल्या आहेत. सदर टाक्यांसाठी सोलापूर महानगरपालिकेकडून पाण्याचे कनेक्शन घेतले आहे. सदर टाक्यामधून बाजार पेठेतील सर्व दुकानांना नळ कनेक्शनद्वारे पाणी देण्यात येणार आहे. तसेच मुख्य बाजार आवारामध्ये सर्व घटकासाठी चार ठिकाणी १००० लिटर क्षमतेचे ४ आर. ओ. प्लान्ट बसविण्यात आलेले आहेत.

❖ **दिवाबत्ती :-** मुख्य बाजार आवारात तसेच जनावर व कडबा बाजार आवारात व प्रक्रिया विभागात १५ ठिकाणी हायमस्ट लाईट बसविले आहेत.

❖ **वेब्रीज :-** मुख्य बाजार आवारात ४० टन क्षमतेचे एक व ६० टन क्षमतेचे एक असे दोन इलेक्ट्रॉनिक वेब्रीज बसविले आहेत.

❖ **जनावर बाजार :-** बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारात दर मंगळवारी जनावरांचा आठवडी बाजार भरविला जातो.

❖ **सुलभ शौचालय :-** मुख्य बाजार आवारात ठिकठिकाणी ८ सुलभ शौचालयाची व्यवस्था करण्यात आली आहे.

❖ **सी.सी.टि.व्ही. कॅमेरे :-** मुख्य बाजार आवारात ठिकठिकाणी सी.सी.टि.व्ही. कॅमेरे बसविले आहेत. व आवश्यकतेनुसार नविन अद्ययावत कॅमरे बसविणेबाबतची प्रक्रीया चालू आहे.

❖ **शेतकरी निवास -** शेतकऱ्यांना राहण्यासाठी सोय व्हावी या हेतूने **१ कोटी ५० लाख** इतक्या रक्कमेचे अद्यावत शेतकरी निवास बांधणेचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे.

❖ **हमाल भवन :-** माथाडी कामगारासाठी मुख्य बाजार आवारात हमाल भवन बांधले आहे.

❖ **व्यापारी भवन :-** व्यापाऱ्यासाठी व्यापारी भवन बांधण्यासाठीचा मानस आहे.

❖ **शेतकऱ्यांना एक रुपयात भोजनाची सोय :-** शेतीमाल विक्रीसाठी आणलेल्या शेतकऱ्यासांठी एक रुपयात भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे.

❖ **शेतमाल तारण कर्ज योजना -** महाराष्ट्र राज्य कृषि पणन मंडळ पुणे यांच्या पत्राप्रमाणे सोलापूर बाजार समितीने दिनांक २५/१२/२०१६ पासून शेतमाल तारण कर्ज योजना सुरु केली आहे. शेतीमालाच्या एकूण किंमतीच्या ७५ टक्के इतके रक्कमेपर्यंत कर्ज ६ टक्के व्याजदराने ६ महिन्याच्या कालावधीची मर्यादा आहे.

❖ **बेदाणा लिलाव -** बाजार समितीच्या मुख्य बाजार आवारात **दर गुरुवारी बेदाणा या शेतीमालाचे लिलाव होतात.**

❖ **रेशीम कोष बाजार पेठ –** महाराष्ट्र शासन रेशीम संचालनालय नागपूर अंतर्गत सोलापूर जिल्हयातील मौजे हिरज, ता. उ. सोलापूर येथे रेशीम कोष बाजार पेठ सुरु करण्यात आली आहे.

पान ४ पहा

❖ **<u>हमीभाव खरेदी केंद्र- स</u>**ोलापूर कृषि उत्पन्न बाजार समिती मार्फत विविध धान्याची आधारभूत किंमतीने खरेदी करण्याकरीता हमीभाव खरेदी केंद्र वेळोवेळी सुरु करण्यात आले आहे.

❖ **<u>चालू कामे</u>** -

१)फळे व भाजीपाला विभागातील राहिलेल्या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे कामाचे एस्टीमेट रक्कम रुपये ९ कोटी इतकी आहे. सदरचे काम चालू आहे.

२)फळे व भाजीपाला विभागातील सेलहॉल डी एफ एच व जे या चार सेलहॉलचे जुने सिमेंटचे पत्रे काढून नवीन लोखंडी पत्रे घालणे कामाचे एस्टीमेट रक्कम रुपये १ कोटी ६० लाख इतकी आहे. सदरचे काम चालू आहे.

३)टि. पी. १ फा. प्लॉट नं. ८ मधील प्लॉट क्यू मधील ४० टनी भुईकाटा भुसार बाजारातील टि. पी. १ फा. प्लॉट नं. ७ मधील ओपन स्पेस नं. १ व ३ जागेत शिफ्ट करणे. सदरचे काम चालू आहे.

❖ **<u>नियोजित कामे –</u>**

१) श्री. सिध्देश्वर बाजार पेठ या मुख्य बाजार आवारात नियंत्रित शेतीमालाची आवक मोठया प्रमाणात वाढत असल्याने बाजार समितीच्या कार्यक्षेत्रात वाहतुकीच्या सोईच्या दृष्टीने राष्ट्रीय महामार्गालगत मुख्य बाजार पेठेच्या जवळपास **५० एकर इतकी स्वतंत्र जागा खरेदी** करणेचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे.

२) श्री. सिध्देश्वर बाजार पेठेतील टि. पी. १ फा. प्लॉट नं. ७ अ मधील ओपन स्पेस नं. २ मध्ये सभामंडप बांधणे कामाचे एस्टीमेट रुपये ५५ लाख इतकी आहे.

३) टि. पी. नं. १ फा. प्लॉट नं. ८ मधील बांधलेल्या उंच टाकीच्या परिसरला कम्पाऊंड वॉल बांधणे कामाचे एस्टीमेट रुपये १८ लाख इतकी आहे.

४) टि. पी. नं. १ फा. प्लॉट नं. ७ मधील बांधलेल्या संपवेल टाकीच्या परिसरला कम्पाऊंड वॉल बांधणे कामाचे एस्टीमेट रुपये २४ लाख इतकी आहे.

५) भुसार बाजारातील अ व ब गुळ गोडावून आणि फळे व भाजीपाला विभागातील प्लॉट पी मधील अ गोडावून नं. ३ व ब गुळ गोडावून नं. ४ या चार गोडावूनचे फ्लोरींग ट्रिमिक्स कॉंक्रीटने करणे कामाचे एस्टीमेट रुपये १ कोटी ५६ लाख

६) श्री. सिध्देश्वर बाजार पेठेतील ओपन स्पेस नं. १ व ३ मध्ये वाहन पार्किंग करणे कामाचे एस्टीमेट रुपये ६ कोटी ३७ लाख

७) फळे व भाजीपाला विभागातील सेलहॉल ए, डी, एफ, एच, व जे. या पाच सेलहॉल मधील फ्लोरींग ट्रिमिक्स कॉंक्रीटने करणे कामाचे एस्टीमेट रुपये २ कोटी ११ लाख

८) श्री. सिध्देश्वर बाजार पेठेतील ए सेलहॉल ते प्लॉट एम व एन पर्यंतच्या सहा रस्त्यावर व मिरची गोडावून व डी सेलहॉल नं. १ मधील रस्त्यावर पत्राशेड घालणे कामाचे एस्टीमेट रुपये १० कोटी २३ लाख

पान ५ पहा

❖ **<u>कर्मचारी –</u>**

बाजार समितीमधील कार्यरत असलेल्या एकूण १४७ कर्मचाऱ्यांना दिनांक १/४/२०२१ पासून महाराष्ट्र शासनाच्या नियमाप्रमाणे सातवा वेतन आयोग लागू केला आहे. तसेच बाजार समितीतील कर्मचाऱ्यांना व त्यांच्या कुटूंबियांना प्रत्येकी ५ लाख याप्रमाणे कॅशलेस विमा उतरविणेचा निर्णय घेतला आहे.

तसेच बाजार समितीच्या माध्यमातून बाजार पेठेत शेतकऱ्यांच्या व हमाल मापाडी कामगारांच्या सोयीसाठी डिस्पेन्सरीची सोय करण्यात येणार आहे.

❖ **<u>ई नाम –</u>**

श्री. सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती सोलापूर चे नाव हे दुसऱ्या फेजमध्ये आहे. बाजार समितीचे व्यापारी, आडते, गाळे तसेच इतर अनुषंगीक माहिती ई-नाम पोर्टलवर लोड करण्यात आली आहे. बाजार समितीच्या मुख्य गेटवर संगणकीकृत गेट एन्ट्री सुरु आहे. बाजार समितीच्या आवारात सध्या सोयाबीन व ज्वारी या शेतमालाचे ई नाम ऑक्शन सुरु आहे. इ नाम पोर्टलवर ४६०० इतक्या शेतकऱ्यांचे नोंदणी करण्यात आलेली असून १७३४ आडते, व्यापाऱ्यांची नोंदणी करण्यात आलेली आहे. तसेच बाजार समितीने इनाम योजने अंतर्गत १३६ शेतीमालाची नोंदणी केलेली असून सद्यस्थितीत ३५ शेतीमालाची ऑनलाईन प्रक्रिया राबविण्यात येत आहे. शेतकरी नोंदणीसाठी बाजार समितीत ई नाम कक्षाची स्थापना करण्यात आलेली आहे.

महाराष्ट्रात खाजगी बाजार समित्या सुरु होत आहेत. त्यामुळे सध्याच्या बाजार समित्यापुढे आवाहन निर्माण झाल्याने सोलापूर बाजार समितीने अधिकाधिक विकास कामे करण्यावर भर दिला आहे. शेतीमालाची आवक झाल्यानंतर वजन व त्वरीत विक्री रक्कम देणेबाबत सर्व घटकांकडून दक्षता घेतली जात आहे. त्यामुळे सोलापूरच्या बाजार पेठेत कांदा व डाळिंब या शेतीमालाच्या आवकेत वाढ होत आहे.

शेतकऱ्यांच्या जीवनमानात आर्थिक सुधारणा व्हावी या उद्देशाने शेतकऱ्यासाठी वेगवेगळे प्रकल्प राबविण्याचा बाजार समितीचा मानस आहे. या संकल्पास आपण सर्वांच्या सहयोगाची अपेक्षा आंम्ही व्यक्त करीत आहोत.

सभापती
श्री सिध्देश्वर कृषि उत्पन्न बाजार समिती,
सोलापूर